# प्रकरण ५वे

# संकीर्ण

## प्रकरण 5 वे

### संकीर्ण

आत्तापर्यंत स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील कवींची महाकाव्ये, रूपके, शतककाव्ये व गद्यकाव्ये यातून व्यक्त होणा-या राष्ट्रीय विचारांचा आढावा घेतला आहे. परंतु केवळ महाकाव्ये, शतककाव्ये, रूपके किंवा गद्यग्रंथ याहीपेक्षा स्फुटकाव्ये, प्रासंगिक लेख, कथा यामधूनदेखील काही कवींनी आपल्या राष्ट्रीय भावना प्रकट केलेल्या दिसून येतात. नियतकालिकांमधून असे साहित्य सतत प्रकाशित होत असते. अशा नियतकालिकांमधून मोठया प्रसिध्द, विद्वान साहित्यिकांप्रमाणेच काही नवोदित साहित्यिकही प्रकाशात येतात. त्या दृष्टीने नियतकालिकीचे महत्त्व दृष्टिआड करता येणार नाही. किंबहुना गुणी साहित्यिकांना प्रकाशात आणण्याचे प्रोत्साहित करण्याचे अमोल कार्य नियतकालिके करीत असतात. इतर भाषांप्रमाणेच संस्कृतमध्येही अनेक नियत-कालिके आहेत.

**संस्कृत नियतकालिके :**

आधुनिक संस्कृत साहित्याचा जन्म संस्कृत नियतकालिकांमधून झाला, असे मानले जाते. संस्कृत नियतकालिकांचा प्रारंभ केव्हा झाला, याबाबत दोन मते आहेत. पहिल्या मतानुसार "पंडित पत्रिका" हे प्रथम संस्कृत मासिक आहे. सन 1866 मध्ये क्वीन्स कॉलेजचे इंग्रज प्राचार्य टी.आर.ग्रिफिथ यांच्या प्रेरणेने ते सुरू झाले. याला पहिले नियतकालिक न मानण्याचे कारण असे सांगितले जाते, की यामध्ये केवळ महत्त्वपूर्ण ग्रंथाचे अनुवाद क्रमशः छापत होते. त्यामुळे पुष्कळांच्या मते इ.स.1873 मध्ये कलकत्ता येथे पं. हृषिकेश भट्टाचार्यांनी संपादित केलेले "विद्योदय" हे पहिले नियतकालिक आहे. सन 1893 मध्ये "संस्कृत चंद्रिका" नावाचे महत्त्वपूर्ण नियतकालिक प्रथम बंगालमधून पं.जयचंद्र सिध्दांतभूषण यांनी संपादित केले आणि नंतर कोल्हापूरमधून अप्पाशास्त्री राशिवडेकरांनी संपादित केले.

डॉ.रामगोपाल मिश्र संस्कृत पत्रकारितेची विभागणी तीन विभागात करतात –

1. एकोणीसावे शतक.
2. स्वातंत्र्यपूर्व काळ.
3. स्वातंत्र्योत्तर काळ.

एकोणीसाव्या शतकातील। नियतकालिकांच्या संपादकांमध्ये आत्मबल, त्याग आणि उत्साह या गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात. यामुळे संस्कृत भाषेबद्दल जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य झाले. एकोणीसाव्या शतकातील संस्कृत पत्रकारितेचे प्रेरक राष्ट्रीय नवोत्थान आहे, असे विद्वानांचे मत आहे.

संस्कृत पत्रकारितेचे दुसरे युग प्रगतिमान राष्ट्रीय आंदोलनाचे युग होते. या काळात नियतकालिकांमध्ये राष्ट्रीयतेच्या भावनेने उग्र स्वरूप धारण केलेले होते. सन 1906 मध्ये पुण्यात श्रीमद् अप्पाशास्त्रींनी संपादित केलेले "सूनृतवादिनी" हे पत्र प्रकाशित झाले. यामध्ये टिळकांच्या केसरी प्रमाणेच सिंह गर्जनेने विदेशी शासनाचा विरोध केलेला आहे. कटुसत्य कथन करीत असल्याने सरकारने हे प्रकाशन बंद केले. या काळातील सुनृतवादिनीशिवाय जयन्ती, विज्ञानचिंतामणि, संस्कृत साकेत, संस्कृतम्, शारदा, मंजुषा, भारतसुधा, भारतश्री वगैरे नियतकालिके निघाली.

तिस-या युगातील संस्कृत नियतकालिकांवर राष्ट्राच्या बहुमुखी उठावांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. पंचशील, गांधिवाद वगैरे नवोदित विचारांचा प्रसार या नियतकालिकांमधून झाला, होत आहे. या काळातील नियतकालिकांवर स्वतंत्र विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. सर्वगंधा, भवितव्यम्, संस्कृतप्रभा, विश्व-संस्कृतम्, भारती, बालसंस्कृतम्, सुधर्मा:, विमर्श:गीर्वाणसुधा अशी अनेक नियतकालिके आहेत.

नियतकालिकांमधून प्रसिध्द होणा-या स्फुटकविता, लेख यामधून व्यक्त होणारे राष्ट्रीय विचार, संस्कृत साहित्यिकांची राष्ट्रनिष्ठा यांचा परामर्श या प्रकरणात घेत आहे. महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या नियतकालिकांमधून प्रसिध्द होणा-या साहित्यातून व्यक्त होणा-या राष्ट्रीय विचारांचा परामर्श घेत असता सोयीसाठी या साहित्याची विभागणी सात भागात करीत आहे.

1. भारतभूमीविषयी प्रेम व्यक्त करणारे साहित्य.
2. विविध राष्ट्रनायक, देशभक्त, हुतात्मे यांना अर्पण केलेल्या श्रध्दांजली.
3. महाराष्ट्राचे गौरव करणारे साहित्य.
4. स्वातंत्र्याविषयीची स्तोत्रे, स्वराज्यातील गुणदोषांची छाननी करणारी काव्ये.
5. राष्ट्रीय एकात्मता वृध्दिंगत करणारे साहित्य.
6. संस्कृत भाषेविषयीची काव्ये.
7. नभोनाटये.

### भारतभूमीविषयी प्रेम व्यक्त करणारे साहित्य

आपल्या राष्ट्रातील विविध भूप्रदेश, नद्या, समुद्र, पर्वत, तीर्थक्षेत्रे यांचे वर्णन करून काही कवींनी आपली मातृभूमीविषयीची निष्ठा व्यक्त केली आहे. आपल्या मातृभूमीची वर्णने करून एकप्रकारे स्वत:ची राष्ट्रनिष्ठा प्रकट केली आहे. आपल्या राष्ट्राचे भौगोलिक, धार्मिक, राजकीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक माहात्म्य वर्णन करणा-या काही काव्यांचा परामर्श आता घेत आहे.

## – मातृभूलहरी –

**डॉ.श्री.भा.वर्णेकर.**

आपल्या राष्ट्रातील विविध भूप्रदेश,नद्या,समुद्र,पर्वत,तीर्थक्षेत्रे यांचे वर्णन करून काही कवींनी आपली मातृभूमीविषयीची निष्ठा व्यक्त केली आहे. आपल्या मातृभूमीची वर्णने करून एकप्रकारे स्वत:ची राष्ट्रनिष्ठा प्रकट केली आहे. आपल्या राष्ट्राचे भौगोलिक,धार्मिक,राजकीय,ऐतिहासिक, सांस्कृतिक माहात्म्य वर्णन करणा-या काही काव्यांचा परामर्श आता घेत आहे.

## – मातृभूलहरी –

**डॉ.श्री.भा.वर्णेकर.**

मातृभूलहरी हे डॉ.श्री.भा.वर्णेकरांचे शतककाव्य आहे. यामध्ये कवीने भारतभूमीचे रोचक वर्णन केलेले आहे. वाचकांच्या मनात मातृभूमीविषयी प्रेम,आदर व श्रध्दा निर्माण करणे हा या काव्यलेखनाचा हेतू दिसून येतो. या काव्यवाचनाने वाचकांच्या मनात देशभक्ती,देशप्रेम निर्माण होण्यास मदत होते.

भारतभूमीचेमानवीकरण करून त्या अनुषंगाने कवीने अत्यंत रमणीय वर्णन केले आहे. हिमालय म्हणजे भारतमातेचा मुकुट ,तिचे पदप्रक्षालन करणारा समुद्र,विंध्यश्रेणी ही मेखला, भागीरथी म्हणजे गळयातील हारच जणू! तिच्या चारी दिशांमधील प्राकृतिक संपदेचे वर्णन करताना दक्षिणेकडील मलय पर्वतावरील सुगंधाचे,पश्चिमेकडील सरस फळांच्या माधुर्याचे,उत्तरेकडील काश्मिरी केशर-कांतीचे तर पूर्वेकडील कमळनेत्रांच्या सौंदर्याचे आत्मीयतेने संस्मरण केले आहे.

भारतवर्षाचे मानचित्र चित्रित करताना कवीने हिंदी महासागर आणि बंगालचा उपसागर म्हणजे दोन्ही बाजूला असलेले दोन पवित्र जलपूर्ण कलश असे म्हटले आहे. येथील पर्वत-गुहा, वृक्ष-वेली,नद्या या सर्वांची शोभा वर्णिली आहे. येथील वसंतादि षड्ऋतूंची रमणीयता प्रकटीत केली आहे.

"धर्म,अर्थ,काम आणि मोक्ष या चार पुरूषार्थांची प्राप्ती करून देणारी कल्पलता!" असा भारतभूमीचा गौरव कवीने केला आहे. येथील आश्रमव्यवस्थेवर प्रकाश टाकून कवीने येथील त्यागपूर्ण संस्कृती विषयीचा अभिमान व्यक्त केला आहे. अहिंसा,सदाचार,तितिक्षा,उदारता,सत्यवादिता,मनस्विता, भक्तिभाव वगैरे मानवीय सद्गुणांचा सोदाहरण उल्लेख करीत कवीने भारतीय संस्कृतीविषयीच्या स्वत:च्या भावना व्यक्त केल्या आहेत. येथील देवतावाद,अध्यात्मवाद,कर्मवाद,कलाकौशल्य,पंचशीलवाद,राष्ट्रवाद, स्वदेशानुराग वगैरे मौलिक वैशिष्टयांचे वर्णन करून कवीने भारतभूमीला जणू मानवंदना दिली आहे !

भारतराष्ट्राच्या अशोकचक्रांकित ध्वज म्हणजे भारतभूमीच्या भाळावरील सुशोभित,

दिव्य चंदनटिळा असे कवीने म्हटले आहे.

अशा प्रकारे भारताचे प्राकृतिक, धार्मिक, सांस्कृतिक वर्णन करून, वर्णेकरांनी मातृभूमी चे स्तवन करून, तिच्याविषयीची निष्ठा, श्रध्दा व्यक्त केली आहे.

**– मन्दोर्मिमाला –**

**डॉ. श्री. भा. वर्णेकर.**

"मन्दोर्मिमाला" हा डॉ. वर्णेकरांच्या चार शतककाव्यांचा संग्रह आहे. यातील "विभूतिवंदना स्तोत्र" हया शतककाव्याचा विचार दुस-या प्रकरणात झालेला आहे. वर्णेकरांनी या संग्रहामध्ये भारतभूमीवरील नद्या, पर्वत, तीर्थक्षेत्रे यांचेही मर्मस्पर्शी वर्णन केलेले आहे. त्यामुळे या संग्रहा-तील काही भागांचा विचार प्रस्तुत ठिकाणी करीत आहे.

या पुस्तकाच्या पहिल्या सात श्लोकांमध्ये भारतभूमी, हिमालय, गंगा, सिंधू, कालिंदी यांचे स्तवन केले आहे. या सर्वांना प्रेमपूर्वक वंदन केले आहे. त्यानंतरच्या आठ श्लोकांमध्ये प्रयाग, रामेश्वर, जगन्नाथ पुरी, अयोध्या, द्वारका, इन्द्रप्रस्थ, पाटलीपुत्र, विजयनगर, पंढरपूर, चित्रदुर्ग, गंगोत्री वगैरे तीर्थक्षेत्रांचे स्मरण केले आहे. त्यानंतरच्या पाच श्लोकांमध्ये श्रुती, स्मृती, रामायण, महाभारत, गीता या भारताच्या आदरणीय ग्रंथाचा सादर उल्लेख आहे. त्यांचा महिमा वर्णन केलेला आहे.

भारतभूस्तोत्रामध्ये मातृभूमीचा जयजयकार करताना वर्णेकर म्हणतात–

"ऋषिचरणसरोजैरंकिता पावनैर्या
नखरकृतकृत्यैर्भूषितोर्जस्वलैश्च ।
बुधजनपरिदीप्तैर्दीपिता ज्ञानदीपैः ।।
जयतु जयतु शश्वनमङला मातृभूमि ।।"[2]

याशिवाय मातृभूमीच्या पारतंत्र्यातील दुःखाविषयी वर्णेकर म्हणतात–

"निगदति यदि सत्यं याति कारानिवासं
नमयति यदि शत्रुं देशनिर्वासनं च ।
विशसति यदि दण्डयं प्राणदण्डं लभेत
नहि नहि खलु दुःखं पारतन्त्र्येणतुल्यम् ।।[3]

परावलंबी राष्ट्राचे वर्णन करताना ते म्हणतात –

"महतो पि राष्ट्रस्य परराष्ट्रावलम्बिनः ।
रक्षणे भरणे ज्ञाने सुमत्थानं न शक्यते ।।"[4]

धनाच्या इच्छेने इंग्रजी भाषेची उपासना करणारे बरेच विद्वान आहेत. ते अगदी उच्च स्वरात तिची स्तुती करतात. परंतु वर्णेकरांना मात्र स्वतःच्या मातृभाषेचा -सुरभारतीचा-संस्कृतचा अभिमान आहे.आणि म्हणूनच तिची सेवा करण्याचे व्रत त्यांनी अंगिकारले आहे. ते म्हणतात -

"आंग्लानां समुपासते हि बहवो भाषां धनाकांक्षया
उच्चैर्घोषामथ स्तुवन्ति बहवस्ते राज्यभाषां हिताम् ।
सेवन्ते हि अभिमानतः कतिपयास्तां मातृभाषां निजाम्
अस्माभिः सुरभारती रसवती सेवार्थमङ्गीकृता ।।"[5]

अशा प्रकारे मातृभूमी आणि मातृभाषा यांच्या विषयीची वर्णेकरांची निष्ठा या काव्यातून प्रकटते.

---

नगाधिराज हिमालय हा जिच्या मुकुटाप्रमाणे आहे,सागर अविरतपणे पादक्षालन करीत आहे,अशा भारतभूमीचे,इथल्या निसर्गाचे,संस्कृतीचे,परंपरांचे साभिमान वर्णन करणारी अनेक स्फुटकाव्ये आहेत.

डॉ दे.खं.खरवंडीकरांनी "गुंजारवः" या नियतकालिकामध्ये भारतमातेची आरती गायली आहे. मस्तकी हिमगिरी हाच मुकुट शोभून दिसणा-या भारतावर स्वर्गनदीने आपल्या पावन जलाने अभिषेक केला आहे. मलयाचलावरील पवन तिचे शरीर सुगंधित करीत आहे. रामकृष्ण,बुध्द-महावीर,व्यास-वाल्मिकी, गांधी-टिळक,जवाहर,सावरकर,सुभाषबाबू असे तिचे अनेक सुपुत्र आहेत. असे म्हणून या भारतमातेच्या प्रभावाने ऐक्य राहो. दैन्य दूर होवो. अशी खरवंडीकरांनी प्रार्थना केली आहे.

"तव प्रभावात् सिध्यतु सर्वेषामैक्यं सद्यो विलयं गच्छतु सर्वेषां दैन्यम् ।
तव प्रसादात् नश्यतु लोके पैशुन्यं वृध्दिं यातु च नित्यं परमं सौजन्यम् ।।"

सविंद [7] या त्रैमासिकामध्ये श्री हरेकृष्ण मेहेर यांनी "मातृगीतिका"हे मातृभूमीचे स्तवन लिहिले आहे.

"जयतु जननी जन्मभूमिःपुण्यभुवनं भारतम्
जयतु जम्बूद्वीपमखिलं सुंदरं धामामृतम् ।।"

या काव्यामध्ये कवीने येथील पर्वत,नद्या,धर्म,संस्कृती यांचे स्तवन केले आहे. आपल्या मातृभूमीविषयीच्या त्यांच्या श्रध्देची प्रचीती येते. व्यास-वाल्मिकींच्या पावन वाणीचा त्यांना अभिमान वाटतो. या सार्वभौम,लोकतंत्र,धर्ममूल राष्ट्राचे विजयगीत त्यांनी गायले आहे.

" स्सार्वभौमं लोकतन्त्रं जयति सत्यं नानृतम् ।
भारतीये मूलमंत्रे जयति सत्यं नानृतम् ।।"

येथे जरी वेश, भाषा, आचार यामध्ये विविधता असली तरी त्या भिन्नतेला ओलांडणारी एकता आहे. कारण आम्हा सर्वांची माता एक आहे. एकाच मातेचे आम्ही सर्व पुत्र आहोत, ही भावना आहे.

"एकमातु सुता: सर्वे न भिन्नत्त्वं स्वीकृतम् ।"

गीवार्णसुधाच्या एका अंकामध्ये "भारतभूमिरियम" हे भारतभूमीचे सर्वार्थाने वर्णन करणारे गीत आहे. नगाधिराजाने अलंकृत केलेली तीन रत्नाकरांनी मंडित, नंदनवनाप्रमाणे सुंदर, स्वर्गनदीसंगिता अशी ही आमची मातृभूमी- भारतभूमी समृध्द संपन्न आहे. अशा या भूमीचे वर्णन करताना कवी म्हणतात:

" पूजाजपतपोमग्ना भूमि: । आगमविषयीभिज्ञा भूमि : ।
अमरेश्वरमाकर्षति भूमि : । आर्यजनादर्शेयं भूमि: ।।

ही रामाची भूमी आहे, कृष्णाची भूमी आहे. ही बुध्दाची भूमी आहे. श्रेष्ठ नराचे पोषण करणारी ज्ञानी, कविजनांनी भूषित, संताच्या वाणीने वर्णिलेली ही ज्ञानभूमी आहे. ही विज्ञानभूमी आहे. ही सत्यभूमी आहे. तत्त्वभूमी आहे.

म्लेंच्छांच्या विलासांनी विलसित, जिच्यासाठी पद्मिनीने प्राणार्पण केले, जिचे राजा शिवाजीने रक्षण केले, आंग्लजनांना जिने मोहविले अशी ही मोहक भूमी आहे. पावक भूमी आहे. ही शौर्यभूमी आहे. धैर्यभूमी आहे.

लक्ष्मी-अहिल्या यांच्या गर्जनांनी गर्जित, पारतंत्र्य-शृंखलामुक्त, स्वातंत्र्यमंत्राने घोषित अशी ही संगरभूमी आहे. ही संकल्पभूमी आहे. संस्कृतभूमी आहे.

केसरीतील लेखाचे अनुसरण करणारी, गांधींच्या तत्त्वांचा पुरस्कार करणारी ही कर्मभूमी आहे. धर्मभूमी आहे. ही अभिमानभूमी आहे. अभिजातभूमी आहे.

जिथून आंग्ल परत फिरले, जिथे तिरंगी ध्वज उंच लहरत आहे, अशी ही स्वातंत्र्यसूर्याचे स्वागत करणारी, लोकांना आनंदित करणारी भूमी आहे. ही विक्रमभूमी आहे. ही चक्रांकित भूमी आहे. ही अभिनवभूमी आहे. ही अभिषिक्त भूमी आहे.

" भारतभूमिरियम् । शांतिभूमिरियं ।।
मातृभूमिरियम् ।।।

गीर्वाणसुधामध्ये प्रा.शाण्डिल्य यांनी "भारतवन्दना" या आपल्या गीतात भारतभूमीला वंदन करताना तिचे सुरेख वर्णनही केले आहे. जिच्या मस्तकावर किरीटातील रत्नाप्रमाणे उज्वल असा "हैमाद्रि" शोभून दिसतो की ज्याच्यावर शंकरांचा निवास आहे. ज्ञानाचे दीप असे वेद आणि वेदांगे जेथे निर्माण झाली ती ही भारतभूमी नेहमी भारतवासीयांकडून वंदिली जावी.

गंगा, सिंधू, सरस्वती, गोदावरी, नर्मदा या पुण्यदायी नद्या आणि त्यांच्या रम्य तीरावर वसलेली देवालये येथे शोभून दिसतात.

येथील सस्यश्यामल भूमी नाना जातीच्या, नाना रंगांच्या फुलांनी सुशोभित आहे. विविध प्राणी येथील वनांमध्ये विहार करतात, तर मधुर कूजन पक्षी करतात, एवढेच नाही तर–

"मुक्त्या स्वर्गसुखं त्विहावतरिता देवाश्च कर्मोद्यता–
स्तेषां पादनिवेशनादियमभूद् भूमिर्द्युलोकाधिका ।।"

कर्म करण्यास उद्युक्त अशा देवतांनी स्वर्गाचा त्याग करून इथे अवतार घेतल्याने त्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी स्वर्गापेक्षाही अधिक पावन आहे.

शेवटी कवी म्हणतात–

"यस्या पादतलं समुद्रसलिलैराक्षाल्पते सर्वदा ।
या गृह्णाति सदा त्रिवर्णलसितामुच्चै र्ध्वजां संस्तुताम् ।।"

"मातृभूमिप्रति" या काव्यात श्री.श्रीराम भि.वेलणकर मातृभूमीचे वर्णन करताना म्हणतात–

" यस्या मूर्ध्नि हिमालयो नगवरो विश्वेश्वरालंकृतो
यस्याः पादयुगं च सिन्धुसलिलै रात्रिंदिवं क्षाल्यते ।
या गंगा यमुनाप्रवाहविमला सह्याद्रिनीलोच्चया
तां मे मातृभुवं नमामि विनतो धीरः सुतः सादरम् ।।"

या काव्यातून श्री.वेलणकरांची मातृभूमीवरील प्रीती तर व्यक्त होतेच परंतु यामध्ये वर्णन केलेल्या प्राचीन परंपरा, संतसज्जन, संस्कृती यातून यासर्वाविषयी त्यांच्या मनात असलेली आदराची भावना व्यक्त होते.

"चरणे तव भारत" या कवितेत श्री.वेलणकर तन मन धनाने मातृभूमीच्या चरणांशी विनम्रतेने विनम्र झाले आहेत ते म्हणतात

" मम चिंतन मम श्वसन मम जीवन भारत ।
तन्मयस्तव विनतो हम् चरणे ते भारत ।।"

श्री.म.स.आपटीकरांनी "नमस्ते गङ्गे "हे गंगास्तवन लिहून गंगेविषयीची आपली श्रध्दा प्रकट केली आहे. आसपासचा प्रदेश धनधान्यांनी समृध्द करीत जाणारी, पापनाशिनी, जीवनदायी, सर्व भारतीयांना पूज्य अशी ही गंगा आहे.

अशा प्रकारे सर्वच कवींची मातृभूमीविषयीची आदराची, श्रध्देची, भक्तीची भावना त्यांच्या कवितांमधून जाणवते.

2. श्रध्दांजली वाहणारी काव्ये-

गांधीजन्मशताब्दिमहोत्सवाच्या निमित्ताने "शारदा" मासिकाचा "गान्धिविशेषांक" निघाला. गांधींच्या जीवनाची, त्यांच्या तत्त्वज्ञानाची छाप भारताच्या जनतेवर पडलेली आहे. एक काळ असा होता की भारतातील बहुतांशी लोक गांधींच्या तत्त्वज्ञानाने भारावून गेले होते. त्यांच्या सत्याग्रहाचा प्रभाव सर्वत्र जाणवत होता. स्वातंत्र्य पूर्वकाळातील हा एक टप्पा " गांधियुग" म्हणून ओळखला जाते. (1920 ते 1949) तेव्हा महात्म्याच्या तत्त्वज्ञानाचा, जीवनाचा संस्कृत वाचकांना परिचय करुन देण्याच्या उद्देशाने, तसेच गांधींचा गौरव करुन त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्याच्या निमित्ताने हा विशेषांक काढण्यात आला. भारतीयांच्या मनांत गांधींच्या विषयीचा आदर भाव वृध्दिंगत व्हावा म्हणून तसेच गांधींनी राष्ट्रासाठी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता प्रकट करण्यासाठी " शारदा" ने हा विशेषांक काढला या अंकातील सर्वच साहित्यिकांची गांधीं श्रध्दा आणि भारताबद्दलची निष्ठा प्रकट होते.

" महात्मा गांधी माहात्म्यस्मरणम् " या लेखात डॉ.ह.रा.दिवेकर यांनी गांधींच्या कांही आठवणी सांगितल्या आहेत. त्यामध्ये गांधींशी "हिंगणे" येथे झालेली प्रथम भेट, पत्नीच्या मृत्युनंतर दु:खी अशा दिवेकरांचे गांधींनी केलेले सांत्वन आणि दिलेला उपदेश, गांधींच्या शस्त्रक्रियेचा प्रसंग अशा प्रसंग वर्णनातून गांधींच्या लोकोत्तर गुणांचे संकीर्तन केले आहे. गांधींच्याविषयी दिवेकर म्हणतात.

" अन्त:समुद्रे स्मृतिवीचय: स्यु: क्षुद्रा महत्त्वो विविध प्रकारा: ।
तासां कतिष्वेथ महात्माजासु निमज्जनेऽस्मि स्वयमेव पूत: ।।"

अन्त:करणरुपी सागरामध्ये महात्माजींच्या स्मृतिरुपी लहानमोठया लहरी उसळत आहेत त्यांच्या स्नानामुळे आपण स्वत:च पावन होत आहोत. त्यांची स्मृती देखील पावक आहे, अशी दिवेकरांची श्रध्दा आहे. आणि त्यांनी हृदयात उमलून आलेल्या स्मृतिसुमनांनी गांधींना श्रध्दांजली वाहिली आहे.

" कतिचित्स्मृतिपुष्पाणि संगृह्य हृदयस्थः ।

एषो अंजलिर्मया दत्तो महात्मागांधीपादयोः ।।"

"भवितव्यम्" च्या "महामानवः महात्मा गांधी" या संपादकीय लेखात श्री.वर्णेकरांनी गांधींच्या राष्ट्रनिर्माणमूलक गुणांची स्तुती केली आहे ते म्हणतात–

" महात्मागांधिना न खलु विरोधिनां विरोधमात्रे
जनतायाः अवधानं केन्द्रितम् अपि तु राष्ट्रनिर्माणं
तैः गुणैः भवति तेषु श्रमरतिः परस्पर बंधुप्रीतिः
स्वार्थभावनाविरतिः इत्यादिषु जनता बलवत् प्रोत्साहिता ।"

गांधींनी जनतेला श्रमपूजा,परस्पर बंधुभाव, स्वार्थत्याग या गुणांनी प्रेरित केले होते. अहिंसा,सत्य अस्तेय,शौच, इंद्रियनिग्रह यांच्या पालनाने समाजधर्माचे पालन करण्यास लोकांना शिकविले या समाजधर्माचे पालन करण्यास लोकांना शिकविले. या समाज धर्माचे राजनीति क्षेत्रात पालन करुन स्वातंत्र्य मिळविण्याचा साहसी प्रयोग त्यांनी केला आणि यशस्वीही झाला. त्याचे स्मरण प्रेरक ठरो" अशी इच्छा व्यक्त करुन श्री. वर्णेकरांनी गांधीजींना श्रध्दांजली वाहिली आहे.

"महात्मनां" श्रीगान्धी महोदयानां जीवनचरितम्"
या आपल्या लेखात गांधींना वंदन करतात पं.पंडरीनाथ पाठक म्हणतात–

" स्थितप्रज्ञस्य का भाषा का निष्ठा वैष्णवे जने ।
साक्षात्कारणम् अत्रैव नमो गांधी महात्मने ।"

गांधींचे अत्यंत थोडक्यात,यथार्थ गुणवर्णन श्री.पाठक यांनी केले आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर –

" यो स्माभिरद्य उपवर्णयितुम् आरब्धः सोऽपि किल महात्मा आश्रयः प्रेम्णाम् आकरः गुणानाम् दिवाकरः अज्ञानान्धतमस्य,प्रलयकरः भारतभूद्विषां, भाग्यं भारतीयानाम्,सोपानमार्ग राजतन्त्रप्रासादास्य, अहिंसावृत्ती,त्यागमूर्तिः महात्मा मोहनदास गांधी महोदयः एवं विधैरेव गुणैः संपन्नं आसीत्"

गांधीचे जीवन बाल्य,शिक्षण, विदेश गमन, स्वदेशी पुनरागमन,सत्याग्रह,विविध आंदोलने,हरिजन सेवा कार्य,स्वातंत्र्यप्राप्ती आणि मृत्यु अशा विविध प्रसंगांतून चित्रित केले आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या मनात गांधीजींच्याविषयी श्रध्दा निर्माण करणे आणि गीर्वाणवाणीची सेवा करणे या

हेतुने श्री.पाठक यांनी या चरित्राचे लेखन सोप्या भाषेत केले आहे. त्यांची गांधीजींवरील श्रध्दा त्यांच्या या लेखनातून व्यक्त होते.

श्री.म.स.आपटीकर यांनी गांधीजींच्या गुणगौरवाचे गान लिहिले आहे–

" गायत गायत भारतपुत्रा राष्ट्रपितुर्गुणगानम् ।

मोहनदासं निर्मलचरित्रम् वैष्णवजनगुणमीडयम् ।।"

स्वदेश सेवा करण्यात ज्यांनी आपले सारे आयुष्य व्यतीत केले,सर्व जगभर ज्यांच्या तत्त्वज्ञानाचा जयजयकार होत आहे,"शस्त्रबलापेक्षा नैतिक बल श्रेष्ठ आहे. हे ज्याने अखिल जगतास पटवून दिले,अशा गांधींचे गौरवगीत गाऊन श्री.आपटीकरांनी आपली गांधीजींच्या विषयीची श्रध्दा व्यक्त केली आहे.

शारदाच्या जानेवारी,1970 च्या अंकात श्री.आपटीकरांनी "गान्धीप्रशस्ति" ही गांधीजींच्या गुणांची प्रशंसा करणारी छोटीशी कविता लिहिली आहे. या कवितेत श्री.आपटीकरांनी गांधीजी हे केवळ भारताचे सुपुत्र आहेत असे न्व्हे तर या पृथ्वीचे धन्य पुत्र आहेत,असे म्हटले आहे

" न केवलं भारतभूसुपुत्रस्त्वमेव धन्यस्तनयो धरायाः "।

शारदा मासिकाच्या 1961 मधील वासंतिक विशेषांकात सावरकर जन्मोत्सवानिमित्ताने श्री.शं.रा.देशपांडे यांनी सावरकरांच्या राष्ट्रप्रेमाचे ,स्वातंत्र्यलढयाचे वर्णन करणारे छोटेसे स्तवन लिहिले आहे. त्यामधून त्यांची सावरकरनिष्ठ राष्ट्रभावना स्पष्ट होते.

" मातृभूमिपारतन्त्र्यपाशपूर्ण मोचने ।

अभडभारतस्य पितृपुण्यभूमिरक्षणे ।।

बध्द कंकणं स्वयं हि शैशवे प्रतिज्ञितम् ।

क्रान्तिवीर नायकं नमामि तं विनायकम् ।।"

शारदा मासिकाच्या 1961 मधील स्वातन्त्र्यदिन विशेषांकामध्ये श्री.विश्वनाथ छत्रे यांनी छत्रपती शिवरायांना मानवंदना करुन ,त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याची स्तुती केली आहे. "जयत्वसौ छत्रपतिः शिवाजिः" या छोट्याशाच काव्यातुन श्री.छत्रे यांची शिवरायांवरील श्रध्दा प्रकट होते.

" यस्योदयादेव सुरक्षितो न चिरं स्वदेशो प्रियहिन्दुधर्म : ।

स्फूर्तिप्रदं यच्चरितं जयत्वसौ छत्रपतिः शिवाजिः ।।"

या अंकात कु.नलिनी पावसकर यांनी "गीतारहस्यज्ञातारो लोकमान्यः" या निबंधातून

लो.टिळकांच्या जनजागरणाच्या कार्याबरोबरच राष्ट्रजागृतीच्या कार्याचे वर्णन करून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली आहे.

याच अंकात पंडित नेहरूंची प्रशंसा करणारे गीत श्री.श्री.ल.आठलेकर यांनी लिहिले आहे. यामध्ये नेहरूंच्या गुणांची प्रशंसा करून त्यांना निरोगी दीर्घायुष्य आणि यश मिळावे असे शुभचिंतन केले आहे.

" सद्वंशो विपुलं धनं निरुपमा प्रज्ञा स्वदेशादये
विद्वत्प्रेम वशंवदा बुधजना विद्वत्तमा चात्मजा ।
पूर्वोपार्जित पुण्यलब्धमखिलं यत्तेन युक्तो भवान्
आरोग्यं पुरुषायुषं च सुयशो यच्छन्तु ते देवताः ।।

लोकमान्यानां चरितादर्शः" या आपल्या शारदाच्या आक्टोबर 1962 च्या अंकातील लेखातून श्री.श्री.ल.आठवले यांनी लोकमान्यांच्या आदर्श चरित्राचे वर्णन करून त्यांना श्रध्दांजली अर्पण करून त्यांच्या विषयीच्या आदराच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

श्री.श्री.ल.देशपांडे यांनी शारदाच्या जून,1965 च्या अंकातील " राष्ट्रदेवः शिवाजी" या काव्यामध्ये शिवाजी महाराजांच्या सद्गुणांची महती गायिली आहे आणि शेवटी म्हटले आहे.

" कठिना राज्यप्राप्तिः कठिनतरं राज्यरक्षणं जगति ।
शौर्यं वीर्यं धैर्यं दिशन्तु सद्यः शिवस्य शिवमार्गम् ।।"

पंडित नेहरूंच्या मृत्युनंतर त्यांना श्रध्दांजली अर्पण करणाऱ्या अनेक कविता,लेख असलेला विशेषांक शारदाने काढलेला होता. यामध्ये डॉ.रा.ना.दांडेकर,अशोक अकलूजकर,वामनशास्त्री भागवत, माधव देशपांडे,द.वा.पोतदार इत्यादिविद्वानांचे नेहरूंचे गुणवर्णन करणारे साहित्य आहे. याशिवाय "बालानां सुखबोधाय बालकानां जवाहरः " या सदरामध्ये पं.जवाहरलाल नेहरूंचे जीवन छोटया छोटया कथांच्या स्वरूपात लहान मुलांसाठी आले आहे. यामधून मुलांच्या मनात नेहरूंविषयी त्यांनी राष्ट्रासाठी केलेल्या कार्याविषयी श्रध्दा निर्माण करण्याचा प्रयत्न दिसून येतो. याशिवाय अनेक स्फुटकाव्ये देखील आहेत.

नेहरूंनी आपल्या मृत्युपत्रात गंगानदीचे जे वर्णन केले आहे,त्याचा संस्कृतानुवाद श्री. काशिनाथ वैशंपायन यांनी केला आहे. त्यावरून नेहरूंची आणि श्री.वैशंपायन यांचीही गंगेबद्दलची भावना प्रकट होते.

श्री.देवासकरांनी नेहरूंना अर्पण केलेली श्रध्दांजली पुढीलप्रमाणे-

" धन्यस्त्वं हि जवाहरासि सततं त्वं शान्तिदूतो महान् ।
त्वं मुक्त्वा सहितं यशो हि कृतवान् गुर्वी त्वया हिंदम् ।।
नेतस्त्वं न दिवं गतो सि न तथा मृत्युं गतो नो नहि: ।
सत्त्वं तिष्ठसि भारतीय हृदये सत्यं चिरं जीवासि ।।"

आंबेडकर जन्मशताब्दीवर्षानिमित्ताने "गुञ्जारव:" या मासिकामध्ये "महामानव:" ही डॉ.दे.खं.खरवंडीकरांनी लिहिलेली कविता आहे. या कवितेत दलितांच्या हितासाठी आंबेडकरांनी केलेल्या कामगिरीबददल कवीने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

इंदिरा गांधींच्या मृत्युनंतर त्यांना श्रध्दांजली वाहणारी व त्यांचा गौरव करणारी अनेक काव्ये नियतकालिकांमधून प्रसिध्द झाली आहेत. गीर्वाणसुधाच्या डिसेंबर 1984 मध्ये सौ कमल अभ्यंकर यांनी " श्रध्दांञ्जली:" ही कविता लिहून आपली श्रध्दा व्यक्त केली आहे.केवळ भारतातच नव्हे तर सर्व जगभर स्त्रीचे स्थान उंचावून आपल्या देशाला इंदिराजींनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. कवयित्री म्हणते–

" विश्वस्य बृहत् साम्राज्ये राष्ट्रमानं वर्धयन्त्यै ।
देशेषु विदेशेषु स्त्रीस्थानमुन्नामयन्त्यै ।।"

राष्ट्राच्या एकतेसाठी त्यांनी आपले जीवन अर्पण केले.

शारदा मासिकामध्ये "इंन्दिरा दिवं गता" या कवितेमध्ये इंदिरा गांधींचाा गुणगौरव करून त्यांच्या निर्घुण हत्येबददल खेद व्यक्त केला आहे.

"कोऽपि प्रलाप:" या काव्यात श्रीमतीइंदिरा परळकर यांनी संतज्ञानेश्वर,लोकमान्य टिळक, रामदास, तुकाराम,सावरकर यांच्या महत्त्वपूर्ण कार्याचा एकेका श्लोकांत उल्लेख करून या सर्व सत्पथ मार्गदर्शकांविषयी श्रध्दा प्रकट करून देव देवळात नव्हे तर प्राणिमात्रांच्या अंत:करणांत असतो. तेव्हा सर्वांनी सद्भावनेने वागावे असे म्हटले आहे.

" देवो देवालये नास्ति भूतह्रदये स तिष्ठति ।
तस्मात् तं सर्वभूतेषु सद्भावेत समाचरेत् ।।

आणि इंदिरा गांधींच्या रक्षकानेच त्यांच्या केलेल्या हत्येबददल या लज्जास्पद वधाबददल खेद प्रकट केला आहे.

अशा प्रकारे विविध विभूतींविषयी श्रध्दा व्यक्त करणारी अनेक छोटी छोटी काव्ये अनेक नियतकालिकामधून प्रसिध्द होतात. या सर्वच साहित्यातून प्रत्येक कवीची विभूतीपूजा करण्याची वृत्ती त्या सर्वांविषयीचा आदर अभिमान तर व्यक्त होतोच पण त्याचबरोबर यातून त्यांचे देशप्रेमही प्रकट होते.देशाभिमान जाणवतो.

३.महाराष्ट्राचा गौरव करणारे साहित्य:

महाराष्ट्रदिनाच्या रजतमहोत्सवानिमित्त "गीर्वाणसुधा" मध्ये श्री.श्रीराम भि.वेलणकरांनी महाराष्ट्राची ओळख करून देणाऱ्या कविता लिहिल्या या सर्वच कवितांमधून त्यांनी येथील भौगोलिक परिसर,तीर्थक्षेत्रे,संत,कवी,शूरवीर यांची वर्णने केली आहेत. महाराष्ट्र हा दगडाधोंडयांचा कणखर देश आहे. येथे मौलिक नररत्नांच्या असंख्य खाणी आहेत. सर्वच क्षेत्रात नाव कमावलेल्या अनेक नर-रमणींचा हा महाराष्ट्र आहे.

येथील राकट,रांगडया, पण भाविक जनतेचे वर्णन श्री.वेलणकरांनी "महाराष्ट्र जनता" या कवितेत यथोचित केले आहे.

" राष्ट्रहितरता कर्तृतान्विता महाराष्ट्रजनता
सज्जना भवच्चरणविनता ।।"

पश्चिम सागराच्या लाटांनी लडिवाळपणे लालन केलेली;गोदा,कृष्णा,भीमा यांनी व्याप्त सहयगिरीचे श्रेष्ठत्व नित्य रक्षिणारी महाराष्ट्र जनता आहे.

स्वराज्यसंस्थापक शिवराय स्वधर्मनिष्ठ शंभू महाराज,स्वकार्यविजयी बाजीराव पेशवा अशा वीरांचे सन्मानपूर्वक स्मरण करणारी महाराष्ट्र जनता आहे.

तुकोबांची अभंगगाथा,ज्ञानेश्वरांची प्राकृतगीता (ज्ञानेश्वरी),रामदासांचा दासबोध शिरोधार्य मानणारी महाराष्ट्र जनता आहे.

तुळजापूरची भवानीमाता,पंढरीचा विठ्ठलराया,कोल्हापूरची अंबामाता यांच्या कृपाप्रसादाने विजयी जीवन जगणारी महाराष्ट्र जनता आहे.

अजंठा,वेरूळ,कार्ला या शिल्पामधील कला कौशल्य जाणणारी, कार्यकुशल महाराष्ट्र जनता आहे.

ब्रहमगिरी,त्र्यंबकेश्वर,घृष्णेश्वर,परळी वैजनाथ,ज्योतिर्लिंग यांच्यापायाशी नतमस्तक होणारी महाराष्ट्र जनता आहे. पवित्र तीर्थस्थानांशी नम्र होणारी उत्सवप्रिय अशी ही महाराष्ट्र जनता आहे.

वाङमय,शास्त्रसंशोधने,राष्ट्ररक्षण,चर्चा,व्याख्याने,संमेदने या सर्वच बाबतीत दक्ष असलेली महाराष्ट्र जनता आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. ज्ञानदेव,तुकोबा,नामदेव,एकनाथ,रामदास,चोखा,गोरा,सावता,जना.......... अशी किती नावे घ्यावीत! या संतांनी आपल्या भावमधुर,भक्तिरसपूर्ण वाङ्मयाने महाराष्ट्र जनतेला उपकृत केले आहे. समभाव,ऐक्य, बंधुता,नम्रता यांची शिकवण या संतानी

आम्हाला दिली आहे. संसार आणि परमार्थ दोहोचा मेळ घालून मोक्षाकडे वाटचाल करण्याची ते प्रेरणा देतात. " मराठी भाषा" या काव्यात महाराष्ट्रातील संतांनी आपल्या वाङ्मयाच्या साहाय्याने जे जनजागरण केले, त्याविषयी कवीने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

ज्ञानीयांच्या राजाने आपल्या दिव्य वाणीने गीतार्थ दिला, एकनाथांनी स्वत:चा धर्म ओळखायला सांगून माणुसकी जोपासायला शिकविले, रामदासांनी व्यवहार शिकविला. तुकोबा, मयुर, रामजोशी महीपती, श्रीधर, वामन यासारख्या भाषानिपुणांनी स्वशब्दाच्या सामर्थ्याने लोकजागृती केली.

"यशवन्ततन्दादीप:" या कवितेत देखील थोडक्यात येथील तीर्थांचे पावित्र्य सांगून संत परंपरेविषयी आदर व्यक्त केला आहे.

" लोकशासननिष्ठाय । जिष्णवे प्रभविष्णवे ।

महाराष्ट्राय मे नम: ।।

स्वतन्त्रप्रज्ञ तेजस्विन् । विद्यासक्त कलानिधे ।

महाराष्ट्र जयोऽस्तु ते

केशवसुत, वासुदेव बळवंत फडके, कर्वे, चिपळूणकर, टिळक, सातवळेकर यांनी व अशासारख्यांनी महाराष्ट्रात जनजागरणाचे कार्य केले. अनेक प्रकारच्या सुधारणा घडवून आणल्या. साहित्य, राष्ट्रसेवा शिक्षण, संस्कृतिजतन, सामाजिक रूढी, परंपरा या संदर्भात महाराष्ट्राला अनेक सद्‌गुरू भेटले. त्यांच्या विषयी आदर, श्रध्दा, कृतज्ञता, "जागरिता जनता महाराष्ट्रे" या कवितेत व्यक्त केली आहे.

अशा प्रकारे या सर्वच कवितांमधून श्री. वेलणकरांच्या मनात महाराष्ट्रविषयी असलेला अपरंपार अभिमान प्रकट होतो.

४. स्वातंत्र्याविषयी स्तोत्रे, स्वराज्यातील गुणदोषांची छाननी करणारी काव्ये –

प्रा. पं. विष्णुदत्त भारद्वाज, यांनी गीर्वाणसुधा मध्ये "प्राप्तं स्वराज्यं न तु रामराज्यं" या आपल्या कवितेमध्ये आपण स्वतंत्र झालो आहोत . हे सत्य पटवून दिले आहे.

धर्माची अपेक्षा होऊ लागली आहे. आपण "गीर्वाणवाणी" ला पूर्वीचे स्थान देवू शकलो नाही अद्यापि । महागाई, भेसळ यांनी आपले जीवन व्यथित होत आहे. दारिद्र्य वाढले आहे. स्वर्गामध्ये गांधी जणु रडून म्हणताहेत

" कष्टं मया लब्धमिदं स्वराज्यम्

सुखी न भाति स्वजनोऽत्रकोऽपि

प्राप्तं स्वराज्यं न तु रामराज्यम् ।।"

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने गीर्वाणसुध्दामध्ये स्वतंत्रतेला उददेशून श्री.वेलणकरांनी एक आर्त गीत रचले आहे की ज्यामधून भारतातील सांप्रत परिस्थिती विषयी खेद व्यक्त केला आहे. त्यांच्या मनाची तळमळ प्रत्येक ओळीतून व्यक्त होते.

धनलोलुप अल्प लक्ष्मीपुत्र वैभवात लोळत आहेत.त्याचवेळी असंख्य सामान्यजन अन्न,वस्त्र आणि निवाररहित आहेत. स्वतंत्र भारतातील हे वैषम्य या कवितेत चित्रित केले आहे. येथे नरहत्या कांडाचे संशोधन चालू आहे. भारतातील प्राचीन सद्गुण विलोपित होत आहेत. येथील सत्य,अहिंसा, शांती,नम्रता नष्ट होत आहे.याबददल खेद व्यक्त केला आहे. परंतु या सर्वाचा परिणाम म्हणून या स्वतंत्रता देवीने भारताला सोडून जाऊ नये म्हणून श्री.वेलणकरांनी स्वतंत्राता देवीला प्रार्थना केली आहे.

" तथापि मा गा इतो भारतात ।"

आपला भारत प्रभावशाली बनावा अशी सदिच्छा व्यक्त केली आहे.

" स्वातन्त्र्यदिने ध्वजारोपणे स्यादियं मनीषा ।
भवतु भारतं प्रशक्तिशाली प्रभवतात् जिगीषा ।।"

5. राष्ट्रीय एकात्मता वृध्दिंगत करणारे साहित्य:

" आधुनिको राष्ट्रवाद:" नावाचा गीर्वाणसुधाने खास विशेषांक काढला होता.यामध्ये राष्ट्र म्हणजे काय ? राष्ट्रीयता म्हणजे काय ? राष्ट्रवाद कशाला म्हणतात? राष्ट्रीयत्वाविषयीला पाश्चात्यांच्या कल्पना कोणत्या आहेत ? या सर्वाचे विवेचन केले आहे. या अंकातील या विषयीचे विवेचन पहिल्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणेच असल्याने त्याविषयी पुन्हा लिहिल्याने पुनरुक्तीचा दोष येईल. त्यामुळे फक्त लेखांच्या नावांचा उल्लेखच येथे करीत आहे.

1. किं राष्ट्र कश्च राष्ट्रिय : ?
2. राष्ट्रियत्वस्य पाश्चात्यं स्वरूपम् ।
3. राष्ट्रियत्वस्य पाश्चात्यकल्पनाया वैफलम् ।
4. राष्ट्रियत्वस्य मीमांसा ।

गीर्वाणसुधामध्ये "नैमित्तिकम" या सदरात श्री.वेलणकरांनी " राष्ट्र एकात्मता" ही कविता लिहिली आहे.भारतामध्ये जरी भिन्न भिन्न संस्कृति प्रवाह असले तरी येथील एकता अखंड रहावी, ती खंडीत होऊ नये. अशी इंच्छा कवीने प्रदर्शित केली आहे.

" रसिकसज्जना: स्वराज्यसधना: भारत एकात्मता
वसतु सा सदैव न: साधिता ।।

भिन्नभिन्न संस्कृतिप्रवाहै: या काले परिमिता

भवतु सा मा तु कदा खण्डिता ।।"

येथे आचार, धर्म, रीती, देवता आहेत. परंतु ते मानवी जीवनाला सदैव सुखद ठरणारे आहेत व राहोत. समाजरक्षण, संवर्धन करण्यासाठी वर्णव्यवस्था आहे. त्यामुळे जातिभेद वाढावेत अशी इच्छा नव्हती. तेव्हा कलह कशासाठी करावयाचा ? मानवधर्माचे सर्वांनी आचरण करावे, अशी वेलणकरांची भावना या कवितेत प्रतीत होते.

"जातिसौमनस्यम्" या कवितेतूनही श्री वेलणकरांची सामंजस्याची कृती जाणवते.

"सुवर्णकारो भवेत् शिक्षक: भवेत्क्षत्रियोनन्नूयोजक: ।

ब्राह्मणोऽपि विद्यते सेवक: किमत्र कलहा जातिस्फुरिता: ।।

व्यवसाय हा आता जातिनिष्ठ राहिलेला नाही. स्वत:च्या आवडीनुसार, कुवतीनुसार व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असताना कलहाचे कारणच काय ? असे वेलणकरांचे मत आहे.

"भारतमाता ऐक्यजीविता 'विविधैर्वर्णैर्भृता'" या कवितेमध्ये एकेका पद्यामध्ये भारतातील एकेका प्रांताचे भाषा, साहित्य, कला याविषयीचे वैशिष्ट्य सांगून सर्व भाषा एकमेकींच्या भगिनी आहेत असे म्हटले आहे.

"भारतकन्या: समिता: । वाक् कन्या: समिता: ।।

भगिन्य एता भाषा: प्रगता: । भाषा: सकला: प्रणता: ।।

सर्व प्रांतामध्ये जवळीक साधण्याचा कवीचा हा प्रयत्न स्तुत्य वाटतो. महाराष्ट्र, गुजराथ, राजस्थान, उत्तरप्रदेश, पंजाब, काश्मीर, बंगाल, मणिपूर, अरूणाचल, मेघालय, आसाम, ओडिसा, तामीळ, आंध्र, कर्नाटक, केरळ या प्रदेशांना या काव्यात कवीने एकीच्या सूत्रात गुंफण्याचा प्रयत्न केला आहे.

"वयं सर्वथा स्वभावभिन्ना एकसदनतनया: ।

कलहविहीना: प्रीतिसंगता: एकता प्रतीता: ।।

हिमवत्तुंगा: सिन्धुगभीरा: कन्धरोन्नता विनता :

सकला भाषा प्रणता: ।"

"किमु संघर्ष: किमर्थं रणम् ?" या कवितेतून सौ कमल अभ्यंकर यांनी भारतातील रम्य निसर्गाविषयी, तीर्थक्षेत्रांविषयी आणि सर्व मातृभाषांची जननी संस्कृतविषयी अभिमान व्यक्त केला आहे. आणि अशी ही आपली अनमोल संपत्ती असता आपण आपआपसात कशासाठी संघर्ष करीत आहोत ?

असा प्रश्न विचारला आहे.

शिवछत्रपती, प्रतापराणा, गांधी, नेहरू, सुभाषचंद्र, टिळक, भगतसिंग वगैरे वीररत्नांनी स्वप्राणांचे बलिदान देऊन भारत स्वतंत्र केला. अशा प्रकारे देशप्रेमाने प्रेरित हिंदु, मुस्लिम, ख्रिस्ती यांनी धर्म, जात, पंथ अशा क्षुद्र मतभेदांना महत्त्व देण्याचे मुळीच कारण नाही. असे सौ अभ्यंकर यांचे म्हणणे आहे.

शंकराचार्य, विवेकानंद हे उदात्त तत्त्वज्ञानाचे दीपस्तंभ आहेत. व्यास, वाल्मिकी, रवींद्रनाथ वगैरे साहित्यिक, शास्त्रज्ञ, कलाकार यांनी जगामध्ये आपल्या देशाची मान उंचावली आहे. अशा प्रकारे आमची भारतभूमी "प्राचीनतमा सौन्दर्यरवनि:" आहे. आम्ही सर्व तिचे पुत्र आहोत. पूजक आहोत. असे म्हणून कवयित्रीने भारताचा जयजयकार केला आहे.

"कोटिकोटिकण्ठरवैरुच्चैः करिण्यामहे एकगर्जनम् ।
वन्दे भारतमातरम् । वन्दे भारतमातरम् ।।"

संस्कृत दिनमहोत्सवाच्या निमित्ताने आकाशवाणी दिल्लीवरुन प्रसारित केले गेलेले आणि ऑगस्ट 86 च्या शारदामध्ये प्रकाशित झालेले पं. वसंतराव गाडगीळांचे भारताच्या सद्य:स्थितीवर प्रकाश टाकणारे गीत "अमृतस्य पुत्रा शृणुत रे !" अत्यंत मार्मिक आहे. भारताच्या प्राचीन परंपरांचा, देशभक्तांचा, क्रांतिवीरांचा, कला साहित्याचा गौरव तर यातून केला आहेच, परंतु याच पार्श्वभूमीवर भारताच्या वर्तमान-कालीन दोषांबद्दल खेदही प्रकट केला आहे. कवीला वाटते की या कुपुत्रांसाठी भारतमाता विलाप करीत आहे.

"कुपुत्र दुश्चरितेन दु:खिता रोदिति भारतमाता ।
निराधारतां गता सांप्रतं विलपति भारतमाता ।।"

रामचरित, सीतेचे पावित्र्य, सतित्त्व इथून नाहीसे होऊ लागले आहे. इथे रावणांची वृध्दी होऊ लागली आहे. धर्मराज्याचा त्याग करुन आम्ही दुर्योधन, दु:शासनाच्या विचारांचे आचरण करायला सुरुवात केली आहे.

राणा प्रताप, छ. शिवराय, तात्या टोपे, झाशीची राणी, भगतसिंग, सावरकर, नेताजी, टिळक, गांधी, नेहरु यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी कलह केले, लढे दिले आणि आपण क्षुद्र स्वार्थासाठी आपआपसात भांडत आहोत. म. गांधी, प्रियदर्शिनी इंदिरा, सरसेनापती वैद्य अशा सारख्यांची हत्या करुन या भूमीला लाजेने मान खाली घालायला लावले आपण ! धिक्कार आहे आपला !

आपण स्वराज्य मिळविले पण सुराज्याचे काय ? स्वार्थी, कर्तव्याची चाड नसलेले जीवन इथे आहे. प्रदूषणग्रस्त वातावरण आहे. विषदेखील शुध्द मिळत नाही. हे वास्तव आहे. हे सारे पाहून भारतमाता विलाप करीत आहे. अशा वेळी हे भारतपुत्रांनो कसली झोप ? कसले जेवण ? आणि

कसली विश्रांती ? उठा,श्रमदेवतेला शरण जा. म्हणजे राष्ट्रदेवता भारतमातेच्या मुखावर निश्चितच हास्य विलसेल. गाडगीळ पुढे म्हणतात–

"राष्ट्रदैवता शरणं मरणं तदथमिकं व्रतम्
सर्वस्वार्पण वृत्तिं गृहीतं यदि सर्वैराश्रितम् ।
मातृभूरियं सर्वस्वं मे यदि नित्यं संस्मृता
ध्रुवं हसिष्यति राष्ट्रदेवता वरदा भारतमाता ।।"

### 6. संस्कृत भाषेविषयीची काव्ये

संस्कृत भाषेची थोरवी,महत्त्व,आवश्यकता स्पष्ट करणारे लेख,कविता सर्वच नियतकालिकां-मधून नेहमीच प्रसिध्द होत असतात. किंबहुना संस्कृत भाषेचा प्रसार हेच सर्व नियतकालिकांचे उदिद्ष्ट आहे असे म्हटले तर चूक ठरणार नाही. संस्कृत दिनाच्या निमित्ताने तर संस्कृत भाषेची गोडी,वैशिष्टये, संस्कृत वाङमयाचे महत्त्व आवर्जून सांगितले जाते. या सर्वच साहित्याचा हेतू संस्कृत प्रचार हा असून त्यांची अभिव्यक्ती मात्र वेगवेगळया स्वरुपात दिसते. शब्दरचना भिन्न आशय मात्र एकच असल्याने व असे बरेच साहित्य असल्याने त्यांचा येथे विस्तार करीत नाही. सर्वांचा मतितार्थ एकच आहे.

महाराष्ट्र संस्कृत परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्राचे तत्कालीन सभापती ना.त्र्यं.शि. भारदे यांनी जे भाषण केले ते "शारदाच्या जून 1963" च्या अंकात प्रकाशित झाले. त्यांच्या भाषणा-तील काही विचार येथे उद्धृत करीत आहे.

§ "धन्यो ऽ हं कृतार्थो ऽ हं स्थितः संस्कृतसेवने ।
संस्कृताभ्यसनं मन्ये स्वपरोध्दारकारकम् ।।"

§ "विशाले भारते खण्डे भिन्नता विविधा खलु ।
एकत्वदायिनी तस्मै धन्या संस्कृत भारती ।।"

§ "राजसंघर्षकाले च न वा राष्ट्रीयकल्पना ।
राष्ट्रत्वदायिनी त्वेषा धन्या संस्कृत भारती ।।"

§ "स्वतंत्रभारते सर्व भारतीयं पुनर्हितम् ।
भारते संस्कृतेर्वाणी श्रेष्ठा संस्कृत भारती ।।"

§ "भाषाभाषाविवादेषु संस्कृतैकत्वदायिनी ।
यथा कन्याविवादेषु माता संवादायिनी ।।"

§ "राष्ट्रिका न वदन्त्यत्र राष्ट्रभाषां हि संस्कृताम् ।
राष्ट्रस्य मूलभाषा हि राष्ट्रभाषैव विद्यते ।।"

वेळोवेळी आकाशवाणीवरून प्रसारित झालेल्या श्री.वेलणकर लिखित रूपकांचा आढावा याच प्रकरणांत घेत आहे. या नभोनाट्यांचे पुस्तकांरूपांतही प्रकाशन झालेले आहे. या रूपकांमधून व्यक्त होणा-या राष्ट्रीय विचारांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे-

## रणश्रीरंङ्गः

श्रीराम भि. वेलणकर

रणश्रीरङ्गः या पुस्तकामध्ये कालिंदी,कैलास कम्प,आणि स्वातन्त्र्यलक्ष्मीः या तीन दृश्य काव्यांचे संकलन आहे. या तिन्हींचेही लेखक श्री.श्री.भि.वेलणकर हे आहेत.

(1) कालिंदी-

हे तीन अंकी रूपक असून यामध्ये अयोध्या नरेश,मगधराज आणि वंगराज यांच्यावर एक काल्पनिक कथा गुंफलेली आहे. आपल्या राष्ट्ररक्षणासाठी अहिंसा व्रताचा त्याग केला पाहिजे हे तत्त्व यामध्ये मांडले आहे.

" विना युध्दं राष्ट्ररक्षणं न सुलभं स्यात् । "[9]

युध्दाशिवाय राष्ट्राचे रक्षण करणे शक्य नाही.

(2) कैलासकम्प-

हे गद्य,पद्यात्मक रेडिओ रूपक आहे.आकाशवाणी दिल्लीने दि.4-3-1963 रोजी रात्री 9.30 वाजता प्रसारीत केले आहे.याचे तीन अंक असून 101 पद्ये आहेत. यामध्ये चीनने भारतावर केलेल्या आक्रमणाचे वर्णन आहे.

चीन भारत युध्दाच्या संदर्भात हिमालयावर राहणा-या उमा-महेश्वरांचा संवाद सादर केला आहे. इंद्रादि अन्य देवतांकडून चीनच्या या कुकृत्याची निंदा केली गेली आहे. भगवान शंकर भारताच्या रक्षणार्थ प्रयत्नशील आहेत. हिमालयाचे महत्त्व देखील वर्णिले आहे. शेवटी युध्द संपल्यावर भगवान शंकराविषयी भारतीय जनतेने कृतज्ञता प्रकट केली आहे. यामध्ये आलेले कांही विचार पुढीलप्रमाणे-

" आपत्काले समुत्थानं महाराष्ट्रस्य सद्गुणः ।
खड्गं खड्गेन विच्छिन्द्यान्महाराष्ट्रं हि भारताः ।।"[10]

विशाल राष्ट्राचे हे वैशिष्टय असते की तो संकट काळात जागरूक असतो. भारतही विशाल राष्ट्र आहे.आणि तो तलवारीचे उत्तर तलवारीनेच देईल.

"जयतु भारतभूमिरियं जयतु शान्ता

क्षमाशालिनी भवताज्जगति वीरता ।।"[11]

भारत भूमीचा विजय असो. विश्वशांतीचा विजय असो. जगामध्ये वीरता क्षमाशाली होवो.

(3) स्वातंन्त्र्यलक्ष्मी–

हे एक रेडिओ रुपक असून दिल्ली आकाशवाणी वरुन 3–6–1963 रोजी ते प्रसारित झाले होते. यामध्ये झाशीच्या राणीची शौर्यकथा आहे. लक्ष्मीबाईची प्रजावत्सलता, देशभक्ती, भारतीय संस्कृती–विषयीची निष्ठा, देशाचे शत्रू जे इंग्रज त्यांना पराजित करण्याची अदम्य भावना आणि त्यासाठी केलेले युध्द आपल्या राष्ट्रगौरवाच्या रक्षणासाठी रात्रंदिवस केलेले प्रयत्न या सर्वांचे केलेले वर्णन भारतीय स्त्री पुरुषांना स्फूर्ती देणारे आहे. यामध्ये आलेले काही राष्ट्रीय विचार पुढीलप्रमाणे–

– " स्वातन्त्र्येटाध्वरे त: समरहुतवहे सादरं संप्रदत्ता ।

पञ्चप्राणाहुतिर्यै स्मितवृतवदनैरस्तु तेभ्यो नमो न: ।।[12]

आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यरणयज्ञामध्ये ज्या देशभक्त वीरांनी हसत हसत आपल्या पंचप्राणांची आहुती दिली त्यांना आमचा प्रणाम असो.

" परचक्राभिगते भारतवर्षे जनानामेक एव पक्ष: भारतीय: ।[13]

भारतवर्षावर परचक्र आले असता लोकांचा एकमेव पक्ष असतो तो म्हणजे भारतीय ।

" स्वराज्यं हि श्रेय: शतगुणितमस्मज्जनहितं

सुराज्यं न प्रेम: परविहितमत्युत्तम मपि ।।"[14]

विदेशी राज्य कितीही चांगले असले तरी ते प्रिय नसते. परंतु स्वराज्य हे शतपट श्रेयस्कर असते. कारण आपले लोक तिथे सुखात असतात.

" भारतानां जना भ्रातृताबन्धना:

वैरिविध्वंसने सन्तु धैर्येन्धना: ।।[15]

भारतीयामध्ये परस्पर बंधुभाव राहो आणि ते आपल्या शत्रूंचा विनाश धैर्याने करोत

– प्राणाहुति :

श्री. श्री. भि. वेलणकर

आकाशवाणी दिल्ली व्दारा 2–12–1963 रोजी प्रस्तुत केलेल्या " हुतात्मा दधीचि:" आणि 28–12–1964 रोजी प्रसारित केलेल्या " राज्ञी दुर्गावती" या श्री. वेलणकर लिखित रेडिओ

रूपकाचे "प्राणाहुति:" या पुस्तकरूपाने गीर्वाणसुधाने 1965 मध्ये प्रकाशन केले.

– हुतात्मादधीचि:

या रूपकामध्ये नाटककाराने आपल्या मातृभूमीसाठी आत्मत्याग करणा–या दधीची मुनींची कथा सांगितली आहे. दधीचींनी राष्ट्रहितार्थ आत्मत्याग केला हे सांगत असता, आपल्या देशाचे स्वातंत्र्यरक्षण करण्यासाठी आपणही असेच आत्मत्यागास तत्पर असले पाहिजे हा बोध श्रोते, वाचक प्रेक्षकांना नाटककार करीत आहे. या रूपकामध्ये आलेले कांही राष्ट्रीय विचार पुढीलप्रमाणे–

" न वा रात्र वीर: शत्रोर्विजेता

स देशो न रक्षेत् स्वातंत्र्यलाभम् ।।[16]

ज्या देशामध्ये शत्रूंना जिंकणारे वीर पुरुष नसतात तो देश आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करु शकत नाही.

स्वातन्त्र्यासाठी सर्व जनतेने प्राणार्पण देखील केले पाहिजे.

" यदा यदा रिपुरुदेति भूमे: वीरसुत: स्वं जुहोते होमे ।[18]

जेव्हा जेव्हा आपल्या भूमीवर शत्रूचे आगमन होते तेव्हा तेव्हा वीरपुत्रांनी त्यांच्या प्रतिकारार्थ युध्दरूपी होमामध्ये स्वप्राणांची आहुती द्यावी.

– राज्ञी दुर्गावती–

राज्ञी दुर्गावतीमध्ये विधर्मी विदेशी लोकांच्या देशविरोधी अत्याचारांपासून भारताच्या मानमर्यादेचे रक्षण करण्यासाठी हाती तलवार धारण करणा–या राणी दुर्गावतीच्या शौर्यकथेचे चित्रण आहे.

आपल्या देशासाठी बलिदान देणा–या दुर्गावतीचे रोमांचक वर्णन करुन श्री. वेलणकरांनी देशरक्षणासाठी प्रसंगी हाती शस्त्र घेऊन रणांगणात उतरण्यासाठी स्त्रियांना प्रेरणा देण्याचा स्त्रियांच्यामध्ये राष्ट्रीय चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री ही अबला, नाही ती देखील पुरुषाइतक्याच सामार्थ्याने स्वराष्ट्र रक्षणासाठी लढू शकते. हे राज्ञी दुर्गावतीच्या चरित्राने सिध्द केले आहे. राष्ट्ररक्षणाच्या कार्यामध्ये स्वत:ची जबाबदारी ओळखुन स्त्रियांनी देखील रणांगणात भाग घेतला पाहिजे, याची जाणीव या चरित्रामुळे स्त्रियांच्या मनात निर्माण होते.

## स्वातन्त्र्यचिन्तामणी

**श्री.श्री.भि.वेलणकर**

स्वातन्त्र्यचिन्ता आणि स्वातन्त्र्यमणि: या दोन रेडिओ रूपकांचे संकलन करून सुरभारती प्रकाशनाने "स्वातन्त्र्यचिन्तामणी" हे पुस्तक 1969 मध्ये प्रकाशित केले.

### स्वातन्त्र्यचिन्ता

हे रूपक दि.2-6-1966 रोजी आकाशवाणी भोपाळ केंद्रावरून प्रसारित केले होते.यामध्ये महाराजा प्रतापची अदम्य देशभक्ती व्यक्त झाली आहे. देशाच्या गौरवरक्षणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न त्यांची हार्दिक राष्ट्रनिष्ठा या रूपकांतून प्रकट होते.

त्याचा पुत्र अमरसिंह,भावी पुत्रवधू यमुना, परममित्र चंद्रावत आणि इतर देशभक्तांची देशभक्ती या पुस्तकांत वर्णिली आहे. त्याचबरोबर देशविरोधी, स्वार्थी मानसिंहाविषयी घृणा व्यक्त करून राष्ट्रनिष्ठेची भावना जागृत केली आहे. श्रोते,वाचक,प्रेक्षकांच्या मनात राष्ट्रीय चैतन्य उद्दिपित करण्यासाठी जागोजागी स्वतंत्रतेची गीते गायिली आहेत. स्वतंत्रतेला मांगल्यकारिणी देवता म्हटले आहे.

"स्वतंत्रते माङ्गल्यदेवते चिरेण ते पदरजो राजते ।"[19]

हे मंगलमूर्ते,स्वातंत्र्यदेवी,तुझी चरणरजा सदैव शोभून दिसते.

स्वातंत्र्याच्या पवित्र भावनेने ओतप्रोत होऊन जीवन व्यतीत करण्यात आत्मगौरव मानला आहे.आपल्या ऐहिक सुखोपभोगांच्या लालसेने देशद्रोह करणाऱ्यांशी रोटी-बेटी व्यवहार निंद्य मानला आहे.[20]

### स्वातन्त्र्यमणि :

या रूपकाचे आकाशवाणी इंदोर,भोपाळ,ग्वाल्हेर, जबलपूर,रायपूर,केंद्रावरून 6-3-67 रोजी प्रसारण झाले.

या दोन अंकी रूपकामध्ये बुंदेलखंडाचे महोबानरेश चम्पतराय आणि त्यांचे पुत्रछत्रसाल यांच्या देशभक्तीचे तसेच भारतीय धर्म व संस्कृतीचे विदेशी यवन शासकापासून रक्षण करण्याच्या त्यांच्या वृत्तीचे चित्रण केले आहे.

यामध्ये आलेले कांही राष्ट्रीय विचार पुढीलप्रमाणे

"स्वातन्त्र्याश्रीः सदा विकसिता । "[21]

नेहमी स्वातंन्त्र्याची शोभा विकसित होत असते.

" शीलं प्रनष्टं तेषां स्यात स्वीकृता यैर्हि दासता ।।"[22]

जो परकीयांचे दास्य पत्करतो त्याचे शील नष्ट होते.

" स्वराज्ये धिकारो जनानां स नित्य:

सुराज्यं भवेदा नवा स्यात् कदाचित् ।

स्वराज्ये सुराज्यं प्रजाभिनियोज्यं ।

स्वराज्यस्य तृष्णा सुराज्यैर्न शान्ता ।।[23]

स्वराज्य हे सुराज्य नसेल कदाचित पण स्वराज्यामध्ये लोकांना अधिकार असतात. स्वराज्याचे सुराज्य प्रजेकडून केले जाते. मात्र स्वराज्याची तहान सुराज्याने शांत होत नाही. श्री.वेलणकरांची स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झटणा-या स्त्री पुरुषांविषयीची श्रध्दा व्यक्त होते. स्वातंत्र्य मिळविणे आणि मिळविलेले रक्षण-करणे हे देशवासीयांचेच कर्तव्य असते. अनेकांच्या समर्पणातून आपण स्वातंत्र्य मिळविले आता ते टिकविण्याची आणि आपल्या देशाचा उत्कर्ष करण्याची आपली जबाबदारी आहे. ही आपल्या कर्तव्याची जाणीव करुन देण्याचा श्री.वेलणकरांचा प्रयत्न दिसून येतो श्री.वेलणकरांच्या मनात हुतात्म्यांविषयीचा असलेला सादर अभिमान तर प्रत्येक रुपकातून व्यक्त होतोच शिवाय त्यांचा स्वराष्ट्राभिमानही प्रकर्षाने जाणवतो.

अशा प्रकारे छोटया कविता,लेख, नभोनाटये यामधून व्यक्त होणा-या साहित्यिकांच्या राष्ट्रीय विचारांचा आढावा " संकीर्ण" या प्रकरणात वैशिष्ट्ये निर्मितीच्या बाबतीतील नियतकालिकांच्या कार्यावर देखील स्वतंत्रपणे निबंध लिहिणे शक्य आहे. परंतु येथे अत्यंत संक्षिप्त धावता आढावा घेतलेला आहे.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | संस्कृत पत्रकारिता का इतिहास | - | पृ.16 |
| 2. | मन्छोर्मिमाला | - | पृष्ठ 60 पद्य 20 |
| 3. | -"- | - | पृष्ठ 50 पद्य 232 |
| 4. | -"- | - | पृष्ठ 51 पद्य 231 |
| 5. | -"- | - | पृष्ठ 53 पद्य 252 |
| 6. | गुंजारव: | | जुलै ते डिसेंबर 1990 |
| 7. | संविद् | - | मे 1990 |
| 8. | शारदा गांधी विशेषांक | - | डिसेंबर 1969 |
| 9. | कालिंदी | - | 3/9 |
| 11. | कैलासकम्प | - | पद्य 31 |
| 11. | -"- | - | पद्य 101 |
| 12. | स्वातन्त्र्यलक्ष्मी | - | 1/1 |
| 13. | -"- | - | 1/15 |
| 14. | -"- | - | 1/1 6 |
| 15. | -"- | - | 3/15 |
| 16. | हुतात्मादधीचि: | - | पद्य 20 |
| 17. | -"- | - | पद्य 48 |
| 18. | -"- | - | पद्य 63 |
| 19. | स्वातन्त्र्यचिन्ता | - | पद्य 1 |
| 20. | -"- | - | पद्य 35 ते 44 |
| 21. | स्वातन्त्र्यमणि: | - | पद्य 15 |
| 22. | -"- | - | पद्य 39 |
| 23. | -"- | - | पद्य 46 |